**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८४

निर्णय दिनांक ०५-०९-२००८

१ श्री. बंदुके दत्ता ज्ञानोबा, : अपिलार्थी
राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी
माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका
किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बंदुके दत्ता ज्ञानोबा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. केंद्रे नागनाथ पांडूरंग, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रोकडोबा बाबुराव शिंदे, अधीक्षक, जन

अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ११-०५-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“१ दि. ५/१०/०५ पासून शिक्षक हजेरीपट नसल्यामुळे.

२. माहे जुलै २००५ पासूनचे व थकित वेतन दाखल न केल्यामुळे.

३. वार्षिक वेतनवाढ न मिळाल्यामुळे.

४. सेवापुस्तिका भरल्या नसल्यामुळे.

१. दि. ५/१०/०५ पासून शिक्षक हजेरीपट नसल्यामुळे दैनंदिन स्वाक्षरी बंद असल्याबाबत.

२. माहे जुलै २००५ पासूनचे थकित वेतन दाखल न केल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे.

३. वार्षिक वेतनवाढ अद्याप न मिळाल्यामुळे पगारात वाढ नाही.

४. सेवापुस्तिका भरल्या नसल्यामुळे भवितव्य धोक्यात व पांचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अद्याप मिळाली नाही.” अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १२-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाशी संपर्क साधण्याचे व त्यांच्याकडून अपिलार्थीस हवी ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे सुचविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने सुरुवातीस निर्देशित केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात सेवक या पदावर कार्यरत असून संस्थेकडून त्यांना कधीही नियमाप्रमाणे पगार दिला जात नाही. वर्ष-सहा महिन्यातून त्यांना एकदा एकत्रितपणे वेतन प्राप्त होत असते. त्यांची सेवापुस्तिका अद्याप भरली गेली नाही, तसेच पाचव्या वेतन आयोगाचा फरकही त्यांना अद्याप प्राप्त झाला नाही. ते या संस्थेत दिनांक ०१-०६-१९९६ पासून कार्यरत असून त्यांना अद्यापपर्यंत एकही पगारवाढ प्राप्त झालेली नाही. या गा-हाण्याचा निपटारा लवकरात लवकर व्हावा असे त्यांना वाटते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर प्रभारी मुख्याध्यापक म्हणून २००५ सालापासून कार्यरत आहेत. ते या संस्थेमध्ये १९९९ साली रुजू झाले तेव्हापासून पगार व वेतनवाढ प्राप्त झाली नाही तसेच त्यांचीही सेवापुस्तिका संस्थेने ठेवलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांनी आयोगास असे अवगत केले की, संबंधित संस्थेची मान्यता काढून घेण्यासाठीचा प्रस्ताव त्यांनी शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्याकडे ३ ते ४ महिन्यापूर्वी सादर केला आहे. या प्रकरणात शिक्षण उपसंचालक यांनी सुनावणी घेतली असून या सुनावणीसंदर्भातला त्यांचा निर्णय अद्याप अप्राप्त आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००५ च्या प्रथम अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने केलेल्या प्रथम अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी त्यांच्या सेवाविषयक बाबी-संदर्भात असलेल्या गा-हाण्याची तड लावण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करु पाहत आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता, ती अधिनियमातील कलम २ (च) मधील ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध त्यांच्या प्रथम अर्जातील मजकुरावरुन होत नाही. या मजकुरावरुन त्यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींशी संबंधित वेतन, वेतनवाढ, अखंड सेवा इत्यादी बाबत तक्रारी केल्याचे दिसून येते. खुद्द जन माहिती अधिकारी यांची अवस्था अपिलार्थीपेक्षा वेगळी नसल्याचे त्यांच्या वरील युक्तिवादावरुन स्पष्ट होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी

आयोगाकडे स्पष्ट केलेली त्यांची स्थिती पाहता या संस्थेची सखोल चौकशी करुन या संस्थेवर कडक प्रशासकीय कारवाई, माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीप्रमाणे कारवाई करणे गरजेचे राहील, असे आयोगास वाटते. अपिलार्थीस व जन माहिती अधिकारी यांना योग्य तो न्याय मिळण्याकरिता शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी या संस्थेच्या सुनावणीसंदर्भातील आपला निर्णय त्वरित पारीत करुन या संस्थेमध्ये चालू असलेल्या, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केलेल्या गैरप्रकारास प्रतिबंध घालण्यासाठी वेळेत योग्य ती उपाययोजना करावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, स्पष्ट स्वरुपात व ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक ०५-०९-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंदुके दत्ता ज्ञानोबा, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.